आर.सी.सी.क्रं.६७१/२०१९
नि. क्रमांक. ३०.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-
माझे नाव :- मनिषा रामकृष्ण माळी,
वय सुमारे :- ४१ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी,
निवासस्थान :- चांदखेड, ता.मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

०१. मी चांदखेड येथे सासू सासरे पती, मुले, जावू व दीर असे मिळून एकत्र कुटूंबात राहतो. माझ्या पतीचा विट भट्टीचा व्यवसाय आहे तसेच शेती आहे. माझ्या पतीने सुधीर बारमुख याची पडीक शेती विट भट्टीसाठी घेतली होती. सदर शेतीमध्ये भुईमुगाचे पिक पेरले होते. दि. २०/०८/२०१९ रोजी श्रीकांत गायकवाड यांनी आमच्या भुईमुगाच्या पिकामध्ये जनावरे घातली होती. माझी सासू अरुणा हिने आरोपीस जनावरे बाहेर काढण्यास सांगितले असता श्रीकांत गायकवाड याने माझ्या सासूसोबत भांडणे करण्यास सुरुवात केली, श्रीकांत गायकवाड याने माझ्या सासूचा हात पिरगाळला व शिवीगाळी केली. माझी सासू भुईमुग खुरपण्यासाठी मजूर घेवून सकाळी १० वा च्या सुमारास शेतात गेली होती. हाणामारीची घटना हि दुपारी ३.३० वा च्या सुमारास घडली होती. घटनास्थळावर गावातील मजूर बायका खुरपणी करत होत्या तसेच विट भट्टीवरील मजूर देखील होते. शेतातील बायांनी श्रीकांत यास भांडण करु नका अरुणा तुझ्या आजीसारखी आहे असे सांगितले असता तो म्हणाला की, आमच्या भांडणामध्ये पडू नका.

०२. घटनेच्या वेळी मी घरी होते. आम्ही घरी जेवण करत असतांना सासुबाई घरी आल्या व त्यांनी घडलेला प्रकार आम्हास सांगितला. त्यानंतर माझे पती व दिर श्रीकांत गायकवाड यास जाब विचारण्यास गेले असता श्रीकांत गायकवाड याने गजाने हातावरती मारहाण केली. माझ्या पतींना श्रीकांत गायकवाड, त्यांचे वडील चंद्रकात व बारका मुलगा शिवदत्त यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर माझे पती व दिर पोलीस ठाण्यात गेले व घडलेली घटना पोलीसांना सांगितली व त्यानंतर औषधोपचारासाठी दवाखान्यात गेले. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकते. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विदवान वकिल श्री. रौंधळ यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

०३. मी अरुणा माळी हिची सुनबाई आहे. घटनेच्या दुस-या दिवशी पोलीसांनी माझा जबाब माझ्या घरी नोंदवला. हे म्हणने खरे आहे की, घटना घडली त्यावेळी मी घरी होते. मी कामानिमीत्त शेतावर जात असते. आमचे घर व शेत यामध्ये चार पाच शेतांचे अंतर आहे. माझी सासू शेतामध्ये जेवणाचे डबे घेऊन जात होती. हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी सर्व जबाब एकत्ररीत्या घेतले होते. हे म्हणने खरे आहे की, माझे दीर व पती श्रीकांत यास जाब विचारण्यासाठी गेले तेव्हा मी त्यांच्यासोबत गेले नव्हते. माझ्या जबाबातील खाडाखोड पोलीसांनी मला दाखवली होती. चुक दुरुस्त केल्यानंतर माझी सही घेतली नव्हती. पोलीसांनी किती सहया घेतल्या होत्या हे मला आठवत नाही.

०४. हे म्हणने खरे नाही की, मी घटना घडतांना घटनास्थळी हजर नव्हते व केवळ सासूने सांगितल्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. २४/०६/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**